

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed
## Multidisciplinary International Research Journal

November-2020





Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with OKEN Scanner

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | शिवाजी--इस्लाम संबंध — प्रा. मंगेश वाहाणे | 1 |
| 2 | गोपीनाथराव मुंढे यांचे सामाजिक कार्य — प्रा.झरेकर रमेश सोनू | 5 |
| 3 | साने गुरूजींचे अनुवादित साहित्य — डॉ. जयश्री शास्त्री | 9 |
| 4 | भटक्या विमुक्तांच्या साहित्याची भाषा : विशेष संदर्भ 'पालावरचं जग' — प्रा. गणेश दिगंबर सावजी | 14 |
| 5 | धरण प्रभावित क्षेत्रातील विस्थापित कुटूंबाच्या समस्या — संजय नामदेवराव तोरवणे / प्राचार्य.डॉ.डी.एस.पाटील | 18 |
| 6 | स्त्री भ्रुणहत्या कारणे व उपाययोजना — सौ. किर्ती नितीन सांगळे | 22 |
| 7 | मानवाधिकार आणि आदिवासी समाज — प्रा.डॉ.उल्हास एन राठोड | 25 |
| 8 | राजे लखुजी जाधवराव कार्य व कर्तुत्व-- एक समालोचन — रविंद्र शंकरराव फटींग | 30 |
| 9 | इक्कीसवी सदी के महिला उपन्यासकारों के उपन्यासोंमें चित्रित नारी — डॉ.प्रमोद परदेशी | 36 |
| 10 | भारतातील बौद्‌धीक संपदा अधिकाराचे महत्व व फायदे : एक दृष्टीक्षेप — संशोधक प्रा. सचिन ग. कर्णेवार / डॉ. प्रशांत म. पुराणिक | 42 |
| 11 | युवावर्गातील फास्ट फुडचे वाढते आकर्षण : आरोग्याची एक भीषण समस्या — प्रा. डॉ. सोनाली राजेश बन्सोड | 46 |
| 12 | जागतिकीकरण आणि शिक्षण यांच्यातील तुलनात्मक अभ्यास — प्रा. डॉ. मंजुषा समर्थ | 50 |
| 13 | बहामनी सुलतान व नरसिंगदेव राय संघर्षातून हिंदू राज्य स्थापनेचे प्रयत्न — डॉ. गजेन्द्र बी. ढवळे | 54 |
| 14 | भारतीय राजनीति में भ्रष्टाचार: एक वास्तव — डॉ. आर. जी. बांबोळे | 58 |
| 15 | मंदोदरीबाई पाटीलयांचे जागृति वृत्तपत्रातील स्त्री सुधारणेविषयक विचार — प्रा. सचिन ज्ञानेश्वर मोरे | 63 |
| 16 | महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यातील अनुसूचित जमाती मधील 'आंध' समुदायाची बोलीभाषा — प्रा. गणेश बंडूजी माघाडे | 66 |
| 17 | कोव्हिड - १९ मधील प्लाझ्मा दान आणि लोकभ्रम — प्रा. कमलेश मानकर | 74 |
| 18 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे आरोग्यासंबंधी विचारांची कोरोना काळामध्ये गरज — प्रा. डॉ. अनुराधा रा. मुळे | 79 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 254 (A)
ISSN : 2278-9308
November,2020

# शिवाजी–इस्लाम संबंध

प्रा. मंगेश वाहाणे
सहाय्यक प्राध्यापक डॉ. एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स
पवनी जिल्हा–भंडारा

प्रस्तावना :–

प्राचीन काळापासून तर मध्ययुगीन कालखंडापर्यंत भारताच्या इतिहासात असे अनेक राजे होवून गेले की, ज्यांनी आपले राज्य स्वबळावर निर्माण केले. अपू–या साधनांनी, ब–याच बार्बीचा अभाव असतांना केवळ उदंड इच्छाशक्तीच्या बळावर शुन्यातून विश्व निर्माण केले. केवळ साम्राज्यच निर्माण केले नाही तर उत्कृष्ठ असे प्रशासन निर्माण करून सर्वांना मान्य असेल स्वराज्य निर्माण केले जे पुढील पिढयांकरीता एक आदर्श ठरले. अश्या राज्यांमध्ये मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या कुशीत जन्मलेल्या शिवाजी महाराजांचे नाव घेता येईल. शिवाजीसारखा कर्तृत्ववान पुरूषोत्तम युगायुगातून कधी तरी जन्माला येतो. तेराव्या शतकापासून हिंदूंच्या क्षात्रवृत्तीला एक प्रकारची अवकळा आली असतांना स्वत्व व स्वाभिमान गमावून बसलेल्या कर्तृत्वान पुरूषांना परकीयांची चाकरी करण्यामध्ये धन्यता वाटत होती अशा बिकट परिस्थीतीत शिवाजीने राष्ट्र व समाज यांच्या पुनरूत्थानाचे कार्य केले. आपल्या असामान्य लष्करी कामगीरीच्या बळावर आपल्याभोवती संघटीत केलेल्या मराठयांसमोर स्वधर्म व स्वराज्य स्थापन करण्याचा उच्च आदर्श ठेवला. हे स्वराज्य स्थापन करीत असतांना स्वधर्मातील लोंकाप्रमाणेच इतरही धर्मीयांची साथ मिळवून केवळ स्वराज्यच वाढविले नाही तर स्वराज्यात स्वधर्मीयांप्रमाणे इतरही धर्मीयांचा विशेषत: इस्लाम धर्मीयाना सुद्वा आपल्या स्वराज्याचा एक अंग बनविले.

शिवाजी महाराजांनी स्वराज्याची मुहर्तमेढ रोवतांना ज्याप्रमाणे स्वधर्मांशी लढावे लागले त्याचप्रमाणे दक्षिणेतील विजापूरची आदिलशाही, मुघल इ. मुस्लीम सत्तांशी देखील लढून राज्य स्थापन केले. दक्षिणेत असलेल्या मुस्लीम सत्ताधा–यांबरोबर लढून जरी स्वराज्य उभारले तरी छत्रपती शिवाजी महाराजांचा संघर्ष हा धर्मसंघर्ष नसून तो सत्तासंघर्ष होता. जे मुस्लीम राज्यकर्ते अन्यायी होते त्यांच्या विरूद्व शिवाजींचा संघर्ष होता. शिवाजी महाराजांना दक्षिणेतील मुसलमानी सत्ता संपुष्टात आणवयाची असे मुळीच धोरण नव्हते. शिवाजी मुस्लीम राज्यकर्त्यांचे जुलमी राज्य नाहीसे करायला निघाला होता. रयतेची काळजी वाहणारे राज्य आणायला निघाला होता. म्हणून मुस्लीम सुद्धा शिवाजीच्या कार्यात सहभागी झाले होते. आपल्या राजकीय विचारसरणीला पोषक असेच धार्मिक सहीष्णूतेचे धोरण शिवाजी महाराजांनी अंगीकारले होते. ज्याकाळात मुस्लीम राज्यकर्त्यांनी आपल्या सत्तेचा विस्तारासाठी, संपत्तीच्या लालसेपोटी हिंदू धर्मीयांची देवालये, मंदीरांची तोडफोड, धर्मांतरे घडवुन हिंदू प्रजेवर अननवीत अत्याचार केले त्याच धर्तीवर शिवाजीने मुस्लीमांना आपल्या राज्यात अभय देण्याचे, राज्याची सेवा करण्याचे व त्यांना राज्यात सामावून घेण्याचे कार्य वेळोवेळी केल्याचे दिसून येते. शिवाजी ख–या अर्थाने प्रजाहितदक्ष, धर्मनिरपेक्ष, सहीष्णूवृत्ती बाळगणारे राज्यकर्ते होते. हिंदू धर्मीयांप्रमाणेच इस्लाम धर्मीयांना सुद्वा सहीष्णूवृत्तीनेच वागविले, त्यांना राज्यात स्वातंत्र बहाल केले. ज्याकाळात हजारो हिंदु सैन्य अनेक मुस्लीम सत्तांकडून लढत होत्या त्याचकाळात शिवाजीने आपल्या सैन्यात हिंदुबरोबर मुस्लीम सैन्यांना समाविष्ट केले होते आणि याच मुस्लीम सैन्यांनी शिवाजीला स्वराज्य उभारण्यात मोलाचे योगदान केले होते. त्यामुळेच शिवाजी महाराजांचे या मुस्लीम सैन्यांवर अपार प्रेम दिसून पडते.



Scanned with OKEN Scanner